# प्रेस नोट

## सहा वर्षांच्या चिमुरडीचा खुन करुन पसार झालेल्या नराधमाला बंडगार्डन पोलीसांनी केले जेरबंद

---

भंगार गोळा करुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर उदरनिर्वाह करणाऱ्या व फुटपाथवर वास्तव्यास असणाऱ्या दांपत्याच्या सहा वर्षांच्या चिमुरडीचा ताडीवाला रोड भागातील एका बंद टेम्पोमध्ये गळा दाबून खुन झाला. त्याबाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे अज्ञात इसमाचे विरुद्ध दि.०६/०७/२०१८ रोजी खुनाचा गुन्हा दाखल आहे.

दि.०४/०७/२०१८ रोजी अंजली शाम वाघमारे, रा. फुटपाथवर, ताडीवाला रोड, पुणे यांची सहा वर्षांची मुलगी गितांजली ही रात्री ०९.३० वा. चे सुमारास ताडीवाला रोड येथील पंचशिल चौकाचे जवळ रस्त्यावर बंद अवस्थेत असलेल्या टेम्पोच्या पुढच्या सीटखाली मृतावस्थेत मिळून आली होती.

त्याबाबत सविस्तर माहिती अशी की, ताडीवाला रोड भागातील फुटपाथवर तिच्या आई-वडीलांसोबत वास्तव्य करणारी सहा वर्षांची मुलगी गितांजली शाम वाघमारे ही बुधवार दि.०४/०७/२०१८ रोजी सायंकाळी ०६.३० वा. चे सुमारास खेळण्याकरीता आई वडीलांपासून गेली असता ती रात्री ०९.०० वा. पर्यंत परत आली नाही. म्हणून तिच्या आई वडीलांनी तिचा ताडीवाला रोड भागात शोध घेतला. परंतू मुलगी गितांजली ही मिळून आली नाही. थोड्या वेळात गितांजलीचा मृतदेह ताडीवाला रोड भागातील पंचशिल चौकाचे जवळ रस्त्यावर बरेच दिवसांपासून बंद स्थितीत असलेल्या टेम्पोच्या ड्रायव्हर सीटचे खाली मिळून आला. तिचा मृत्यू घातपाताने झाला असल्याचा संशय असल्याने बंडगार्डन पोलीसांनी अज्ञात इसमाचे विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. घटनास्थळी वरिष्ठांनी भेटी देऊन पुढील तपासाबाबत व आरोपी निष्पन्न करुन अटक करण्याबाबत मार्गदर्शन केले.

बंडगार्डन पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे निखील जाधव यांना त्यांचे बातमीदाराकडून आरोपीबाबत माहिती मिळालेली होती. एम.एम.मुजावर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.निरीक्षक एस.के.झावरे यांचे मार्गदर्शनाखाली. निखील जाधव यांना मिळालेल्या माहितीवरून, इसम नामे गणेश बसवराज गायकवाड मुळ रा. गुलबर्गा, कर्नाटक यास तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे, पो.कर्मचारी कैलास डुकरे, रूपेश पिसाळ, अय्याज दड्डीकर, सचिन कदम, पांडुरंग कांबळे यांनी ढोले पाटील रोड, पुणे भागातून ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचे बाबत त्यास विश्वासात घेवून तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. त्याचेकडे सखोल तपास केला असता तो टेम्पोमध्ये दारु पित असताना गितांजली ही तो बसलेला असलेल्या टेम्पोजवळ जाऊन टेम्पोचा दरवाजा वारंवार वाजवत होती. त्याने तिला दरवाजा वाजवू नको असे सांगून देखील गितांजली दरवाजा जवळ खेळत होती. त्याने सांगून देखील ती बाजूला गेली नाही. याचा त्याला राग आल्याने त्याने तिला टेम्पोमध्ये ओढून घेऊन तिचा हाताने गळा दाबून तिला जीवे ठार मारले असल्याचे सांगितले.

सहा वर्षे वयाच्या लहान मुलीचा खून झालेला असताना, खुनाचे नक्की कारण व खुन करणाऱ्याबाबत काहीएक खात्रीशिर माहिती नसताना, पो.कर्मचारी निखील जाधव यांना मिळालेल्या खात्रीशिर माहितीवरून गुन्हयातील आरोपी निष्पन्न करून, तसेच आरोपी त्याचे मुळ गावी पळून जाण्याच्या तयारीत असताना, त्यास ताब्यात घेवून, अटक करून गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

दक्षिण प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, श्री. रविंद्र सेनगावकर, परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त डॉ. प्रविण मुंढे, सहा. पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, श्रीमती जयश्री गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक संदिप जमदाडे हे त्यांचे पथकातील पो.कर्मचारी फिरोज शेख, संतोष पागार, नवनाथ डांगे व श्रीधर सानप यांचेसह करीत आहेत.